# मेट्रो-३ : जागृतीसाठी स्वाक्षरी मोहीम

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (एमएमआरसी) चर्चगेट रेल्वे स्थानक येथे आयोजित स्वाक्षरी मोहिमेस प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाला. प्रवाशांसह सिडनेहॅम महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वाक्षरी मोहिमेत भाग घेत मेट्रो ३ काळाची गरज आल्याचे मत यावेळी व्यक्त केले.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ या मुंबईतील पहिल्या संपूर्णतः भुयारी मार्गाविषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी म्हणून या स्वाक्षरी मोहिमेचे आयोजन करण्यात आल्याचे एमएमआरसीने स्पष्ट केले. प्रकल्पाचे पर्यावरणीय, आर्थिक महत्त्व प्रवाशांना पटवून देण्याच्या हेतूने चर्चगेट स्थानकावर एक माहिती केंद्र देखील स्थापन करण्यात आले होते. स्वाक्षरी मोहिमेला मिळालेल्या भरघोस प्रतिसादामुळे आनंद वाटतो आहे, असे एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे म्हणाल्या. अशा प्रकारे मिळणारा पाठिंबा आमचा उत्साह वाढवतो, असेही त्यांनी सांगितले.